दै. पुण्य नगरी (11)

# नांदेड महानगरपालिकेसाठी ३ लाख ९६ हजार मतदार

नांदेड/प्रतिनिधी

नांदेड वाघाळा महानगरपालिकेची सार्वत्रीक निवडणूक ११ ऑक्टोबर रोजी होणार असून त्यासाठी ३ लाख ९६ हजार ५८० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाली असून उमेदवारी जाहीर होण्याआधीच इच्छुक उमेदवार सकाळपासून रात्रीपर्यंत प्रभागात मतांची जुळवाजुळव करीत आहेत.



महापालिकेची मुदत ३१ ऑक्टोबर रोजी संपत आहे. तत्पूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. नांदेड शहराची लोकसंख्या लोकसंख्या ५ लाख ५९ हजार ४३९ असून यापैकी ३ लाख ९६ हजार ५८० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. एकूण २०प्रभागांतील ८१ जागांसाठी मतदान होईल. त्यापैकी ४१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १५, अनुसूचित जमातींसाठी २ तर नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २२ जागा आरक्षीत आहेत. या निवडणूकीची तयारी प्रशासकीय स्तरावर (पान ३ वर...)

(पान १ वरून)

## नांदेड महानगरपालिकेसाठी...

केली जात असून १६ सप्टेंबरपासून नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यास प्रारंभ होणार आहे. २३ सप्टेंबर नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी अंतिम दिनांक असेल. प्राप्त अर्जाची छाननी २५ रोजी करण्यात येणार आहे. २७ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. त्यानंतर निवडणूक रिंगणातील अंतिम उमेदवारांना २८ रोजी निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येणार आहे. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदार मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावतील. मतमोजणी व निवडणूक निकाल १२ ऑक्टोबर रोजी घोषित केला जाईल.

दै. लोकमत (12)

# मतदान जागृतीसाठी नांदेड मनपाचा मिसकॉल फंडा

**नांदेडः प्रतिनिधी**

मतदानाची टक्केवारी वाढावी, लोकांनी मतदान करावे यासाठी जनजागृती करण्याकरीता महानगरपालिकेने एक नंबर देवून मिसकॉल द्यावा असा नवा फंडा सुरू केला आहे.

नांदेड वाघाळा

शहर महानगरपालिका क्षेत्रात दि. ११ ऑक्टोबर रोजी बुधवारला होणाऱ्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत मतदार जागृती करण्यासाठी ८०००६४४०१८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर मिसकॉल करावयाचा आहे. मिसकॉल नंतर लगेच मतदाराला नमस्का आपण दिलेल्या प्रतिसादाबद्दल धन्यवाद दि. ११ ऑक्टोबर रोजी महापालिका निवडणुकीत आपल्या मतदानाचा हक्क बजावून सहकार्यकरावे ही विनंती, असा संदेश महापालिकेच्यावतीने प्राप्त होईल.

महानगरपालिकेच्यावतीने या राष्ट्रीय कार्यात जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे म्हणून मतदान जागृती कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, त्याचाच एक भाग म्हणून वरील क्रमांकावरव मिसकॉल देण्याचा उपक्रम राबवलेला आहे. यास जागृत मतदार या नात्याने आपण भरघोस प्रतिसाद द्यावा असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

कोणतीही निवडणूक असो त्या दिवशी शासकीय कर्मचारी,शाळा महाविद्यालयांना मतदान करण्यासाठी सुट्टी घोषीत करण्यात येते परंतू अनेक जण या सुट्टीचा आनंद घेतात मात्र न करता मात्र असे न करता नागरिकांनी मतदान करावे यासाठी ही जनजागृती करण्यात येत आहे.

(13) दै. [illegible]

# मतदार जनजागृतीसाठी ८०००६४४०१८ या क्रमांकावर मिसकॉल देण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**-नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. ११ ऑक्टोबर बुधवार रोजी होणाऱ्या नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदार जागृती करण्यासाठी ८०००६४४०१८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर मिसकॉल करावयाचा आहे. मिसकॉल नंतर लगेच मतदाराला 'नमस्कार' आपण दिलेल्या प्रतिसादाबद्दल धन्यवाद, दि.११ ऑक्टो.२०१७ बुधवार रोजी महापालिका निवडणुकीत आपल्या मतदानाचा हक्क बजाऊन सहकार्य करावे ही विनंती असा संदेश महापालिकेतर्फे प्राप्त होईल.



महानगरपालिकेतर्फे या राष्ट्रीय कार्यात जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे म्हणून मतदान जागृती कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, त्याचाच एक भाग म्हणून वरील क्रमांकावर मिसकॉल देण्याचा उपक्रम राबवलेला आहे यास जागृत मतदार या नात्याने आपण भरघोस प्रतिसाद द्यावा असे आवाहन महापालिकेतर्फे एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

